6 1/47

2016-17
I

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta™

International Multilingual Research Journal

Issue-15, Vol-04, July to Sept.2016

Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

P. 106 to 109



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept. 2016
Issue-15, Vol-04

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

❖ 'विद्यावार्ता' हे त्रैमासिक मालक व प्रकाशक अर्चना राजेंद्र घोडके यांच्या हर्षवर्धन पब्लिकेशन प्रायव्हेट लिमीटेड, लिंबागणेश, जि. बीड महाराष्ट्र येथे मुद्रीत करुन संपादक डॉ. बापू गणपत घोलप यांनी मु.पो. लिंबागणेश, ता.जि.बीड–४३११२६ येथे प्रकाशित केले.

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
Mobi. 09850203295, 07588057695



Scanned by CamScanner

23) लोकगीतातील मूल्यविचार
प्रा.डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, शिवाजीनगर, गढी ता.गेवराई, जि.बीड || 98

24) लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रवादी विचारांची उपयुक्तता:एक विश्लेषणात्मक अभ्यास
प्रा. डॉ. संभाजी संतोष पाटील, शिंदखेडा, जि. धुळे || 100

25) विद्यापीठ परिक्षेतील गैरप्रकार आणि त्याबद्दलच्या शिक्षेसाठीच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनाची मीमांसा
प्रा. श्री गणेश जोशी-श्री प्रमोद टोतोहहाके, परेल || 103

26) स्वराज्याचा इतिहास घडविणारा भूगोल
प्रा. डॉ. प्रशांत देशमुख, शेंदुर्णी, जि. जळगांव || 106

27) अध्यापक–आचार्यांचा तणाव, कार्यबध्दता आणि संस्थानिहाय बांधिलकी यांच्या सहसंबंधांचा अभ्यास
संगीता पाटकर—डॉ.एस.आर.पांडया, मुंबई || 110

28) खावटी कर्ज योजनेचा अभ्यास; विशेष संदर्भ—नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी तालुका
प्रा. पावरा मोहन ठोग्या, धुळे—प्रा. डॉ. एच. व्ही. चव्हाण,जळगांव || 115

29) नागार्जुन की काव्य-यात्रा का यथार्थ-बोध
डॉ. अनिता एच. भट्ट, सिध्दपूर, जि.पाटन || 122

/sites.google.com/site/vidyawartajournal
Scanned by CamScanner

यांना माहित आहे हे विद्यापीठाने गृहीत धरले
५.५५% विद्यार्थ्यांना कल्पनाच नाही.
र्थ्यांबाबत मात्र विद्यार्थीवर्गाचा सहानुभूतीचा
७५.५५% विद्यार्थ्यांनी गैरप्रकारांसाठी केवळ
शिक्षा योग्य वाटत असल्याचे म्हटले आहे.
र्यांनी ती शिक्षा जास्तीत जास्त २ वर्षांपर्यंत
आहे.

युवापिढीची मानसिकता सर्वसाधारणपणे
ारखी आहे असे गृहीत धरले आहे. म्हणूनच
ळ १५ महाविद्यालयांतील काही विद्यार्थ्यांचा

र्तभूत विद्यार्थ्यांचे चारित्र्य अथवा वर्तन ह्यांची
ली नाही त्यामुळे त्यांनी मांडलेल्या मतांशी
ाचा सहसंबंध (correlation) मांडलेला

य विश्लेषणासाठी अत्यंत प्राथमिक स्वरूपाचे

लेखक प्राध्यापक असलो तरी आम्ही
ठे जे मांडले आहे ते केवळ सर्वेक्षण आणि
तिपादिले आहे.

ठ सूची.
n
.edu/sosci/rlong/race/far-

dia.com/mumbai/report-
in-cheating-cases-left-out of
iversity-s-reply-to-rti-query-

ondc.in/city-news/copy-in-
article 91717
तक फेब्रुवारी २०११.
क आव्हान श्रीमती मंगला लाडके
तक ऑगस्ट २०११
सर्वकष मूल्यमापनाची उपयोगिता श्री

□□□

**26**

# स्वराज्याचा इतिहास घडविणारा भूगोल

**प्रा. डॉ. प्रशांत देशमुख**
अप्पासाहेव र. भा. गरुड महा. शेंदुर्णी, जि. जळगांव

**********

**प्रस्तावना :**

इतिहास आणि भूगोल यांचा अनोन्य संवंध आहे. रिचर्ड हैकलूट हा विचारवंत म्हणतो की, भूगोल आणि कालगणना सूर्य आणि चंद्राप्रमाणे होत. हे इतिहासाचे उजवे आणि डावे दोन डोळे होत. (Geography and Chronology are the sun and moon, the right eye and left of all history.) देशाला एका विशाल वृक्षाची उपमा दिली तर Geography will be it's root and history it's fruit (भौगोलिक परिस्थिती हे मुळ आहे तर इतिहास हे फळ आहे). इतिहास हा भौगोलिक परिस्थितीचे उगम स्थान होय. (In fact history is the product of geography.) इतिहास आणि भूगोलाशी सहसंबंध- Geography is the mother & history is it's daughter and the personality of the mother is clearly visible in the personality of the daughter असे म्हणतात. भूगोलाला इतिहासाचा आरसा संबोधतात भूगोलाचे प्रतिबिंब इतिहासात दिसते. Geography is the mirror in which the image of history is reflected .

भौगोलिक घटकांचा प्रभाव इतिहासावर पडतो इतिहास व्यक्तीच्या कार्य-कर्तृत्व आणि विचारांची कहाणी आहे. भूतकाळाचा आरसा आहे, मनुष्याच्या सहसंवंधांची यश-अपयशाची कहाणी आहे. व्यक्तीच्या-राष्ट्राच्या जडण-घडणीवर भूगोलाचा परिणाम होतो. स्वराज्याच्या जडण-घडणीत भूगोल महत्वपूर्ण घटक राहिला आहे. स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी राजे भूगोलाचे उत्तम ज्ञाते होते.

**स्वराज्य चतु सीमा :**

वारामावळ प्रदेशाच्या विस्तारानंतर- स्वराज्याचा विस्तार इ.स. १६४३ पासून विस्तारला. स्वराज्याचा विस्तार १६४३-१६८० ह्या कालखंडात झाला. स्वराज्याचे प्रादेशिक चार भाग होते, यास 'सुभा' म्हणत. खेडे-गांव-तर्फ/महल, परगणा, सुभा, सरसुभा असे स्वराज्याचे घटक होते. स्वराज्याचे चार सुभे-



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta™
July To Sept. 2016
Issue-15, Vol-04


सुभा क्र.१- कोकण- साल्हेर- पुणे.

सुभा क्र.२- पुणे-धारवाड.

सुभा क्र.३- दक्षिण कोकण, कारवार, वेद्पर्यंतचा प्रदेश.

सुभा क्र.४- म्हैसूर- तामिळनाडू.

सुरत-गणदेवी ते वसरूर-कारवार-मंगळूर, श्रीवर्धन ते इंदापूरपर्यंतचा प्रदेश पहिल्या सुभ्यात होता. कर्नाटक भागातील वाळापुर, कोलार, होस्पेट, वंगलोर, साजरा-गोजरा, वेल्लोर, अरणी व जिंजी हा पश्चिम कर्नाटकातील भाग एका सुभ्यात होता. १५६६ ला विजयनगर साम्राज्याच्या स्मृती विस्तृतीत गेल्या, विजयनगर साम्राज्यातील कोप्पळ, हॉस्लेट, सोंडूर, वेल्लारी, शिरेंचा भाग छत्र. शिवाजी राज्यांच्या स्वराज्याचा एक सुभा-प्रदेश होता. वंगालच्या उपसागराच्या दक्षिण भागातील तमिळ नाडूतील तीरुवाडी, तंजावर, ट्राक्वेवार, वेगापट्टण, तीरुवालूर हा प्रदेश स्वराज्यात समाविष्ट होता. पूर्व भागातील वंगाल उपसागराचा दक्षिण किनाऱ्याचा भाग आणि अरवी सागरातील सुरत ते मंगरूळ पर्यंतचा प्रदेश स्वराज्यात समाविष्ट होता.




पश्चिम किनाऱ्यावर गणदेवी ते मंगरूळ-अंकोलापर्यंत श्रीवर्धन ते इंदापूर (पश्चिम-पूर्व विस्तार) आणि कर्नाटक-आंध्र-तमिळनाडू यांना जोडणारा चिंचोळा भाग स्वराज्यात होता तर पूर्वेला कांची पासून ते चिदंवरम-तंजावर पर्यंतचा भाग स्वराज्यात होता.

**स्वराज्यातील प्राकृतिक घटक :**

महाराष्ट्राचा क्षेत्रविस्तार महानुभाव ग्रंथकार कवी डिंभ कृष्णमुनी यांनी -

विंध्याद्रीपासून दिशेसी। कृष्णा नदीपासौनी उत्तरेसी।
झाडी मंडळा पासोनी पश्चिमेसी। महाराष्ट्र वोलिजे।

असे दिले आहे.

पर्वतरांगा महाराष्ट्राच्या पश्चिम वाजूस उत्तर दक्षिण भागात उत्तुंग पर्वतांनी आणि घनदाट वृक्षसृष्टी यांनी युक्त पर्वत रांग ६४० कि.मी. होय. याच पर्वत रांगांनी स्वराज्याला जगणे-मरणे शिकविले. सह्याद्री पर्वत रांगांच्या पश्चिमेस अरवी सागर किनाऱ्याची चिंचोळी किनारपट्टी तर सह्याद्रीच्या पूर्वेला घाटमाथ्यावरील गिरीदुर्गांनी उंचावलेले विस्तीर्ण पठार. याच पठारावर स्वराज्यातील दुर्गम दुर्ग आहेत. सह्याद्रीच्या उत्तरेला (पठाराच्या उत्तरेला) पश्चिम-पूर्व भागात विस्तृत पसरलेली सातपुडा पर्वत रांग आहे.

**नद्या :**

स्वराज्याच्या-महाराष्ट्रातील सुभ्यांच्या- सातपुड्याच्या उत्तरेला वाहणारी नर्मदा, दक्षिणेस वाहणारी तापी आणि पूर्णा तर पठार भूभागातून वाहणारी गोदावरी, भीमा आणि कृष्णा, कोकण भागात वैनगंगा, उल्हास, कुंडलिका, सावित्री, वसिष्ठी या नद्यांनी संपन्न केलेला प्रदेश होता-आहे. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून अरवी सागराला मिळणाऱ्या नद्यांचा वेग-ओघ अति वेगाने असतो. कधी या नद्या खोल दरीतून तर कधी पर्वतांना वळसा घालून अरव सागराला मिळतात. या नद्यांच्याच मुखाजवळ दाभोळ, श्रीवर्धन, वसई सारखी संपन्न वंदरे-वाजारपेठा आणि शहरे वसलेली आढळतात. सह्याद्री पर्वतरांगांनी सुरक्षित केलेली किनारपट्टी कोकणची आहे. स्वराज्यात पश्चिम किनाऱ्यावर सुरत-गणदेवीपासून ते गंगावली नदी किनाऱ्यारील अंकोला वंदरपर्यंतचा भाग स्वराज्यात होता.

स्वराज्यातून वाहणाऱ्या नद्यात-तापी, गोदावरी, कृष्णा, घोडनदी, मुला-मुठा, भीमा, हिरण्यकशी नदी, मलप्रभा, तुंगभद्रा, वेदवती, पेन्नेरू, पौन्नेयार, कोलेरून, पालर, गंगावली नद्यांच्या द्वारा संपन्न झालेला प्रदेश होता. उत्तरेला गोदावरी तर दक्षिणेला कोकण प्रदेशांत वाहणारी गंगावली नदी (अंकोला), तर तामिळनाडू मध्ये कालेरून नदी दक्षिण भागात स्वराज्याची सीमा होती.

**किनारपट्टी:- वंदरे**

आज महाराष्ट्राला ७२० कि.मी. चा किनारा-अरव सागराचा लाभलेला आहे. स्वराज्याचा विस्तार सर्वाधिकपणे पच्छिम किनाऱ्यालगत छत्रपती शिवाजी राज्यांनी केला. नर्मदेच्या किनाऱ्यावरील भडोच आणि तापी किनाऱ्यावरील सुरत ही प्रमुख गुजरात मधील वंदरे मोगलांच्या ताव्यात होती, मात्र गणदेवी, रामनगर (धरमपूर), सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, कारवार, अंकोलाचा तावा हा स्वराज्यात होता. पूर्व किनाऱ्यावरील कांचीच्या दक्षिणेला देवनापट्टनम, कडलूर, चिदंवरम स्वराज्यात असणारे वंदरे



Scanned by CamScanner

होती. दमन, वसई, गोवा हे पच्छिम किनारे पोर्तुगीजांकडे होते. तर मुंवई आणि जंजिरा अनुक्रमे ब्रिटीश आणि सिद्दीकडे होते. तर पूर्व किनाऱ्यावरील स्वराज्याचा संवंध येणाऱ्या किनारपट्टी लगत पुदुचेरी (पांडेचेरी) हे फ्रेंचांकडे असणारे वंदर होते.

दमणपासून ते कारवार पर्यंत माहीम, वसई, साष्टी, मुंवई, उंदेरी, खांदेरी, अलिवाग, चोल, कोरलाई, पद्मदुर्ग, जंजिरा श्रीवर्धन, सुवर्ण दुर्ग, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, जैतापूर, विजयदुर्ग, देवगड, सिंधुदुर्ग, वेंगुर्ला, गोवा, कारवार, या वंदरांचा सतत संपर्क आणि संघर्ष स्वराज्याशी होत असे. स्वराज्याचा आरमाराशी संपर्क इंग्रज, पोर्तुगीज आणि सिंधी या तीन परकीय सत्तांशी आला. स्वराज्याचा पाया सह्याद्रीच्या डोंगरापलीकडे मावळात तोरणा किल्ला घेऊन १६४६-४७ मध्ये घातला याच वेळी चौल-साष्टी-वसई-तारापूर-माहीम इ. ठिकाणी पोर्तुगीजांनी आरमारी सत्ता भक्कम केलेली होती.

इ.स. १६१८ ला जहांगीर वादशाहाने मुघलांचे सुप्रसिद्ध वंदर सुरत मध्ये व्यापार सुरु करण्यासाठी ब्रिटिशांना परवानगी दिली होती. तर मुंवई १६६५ पर्यंत पोर्तुगीजांच्या ताव्यात आले होते.

स्वराज्याच्या कोकण किनारपट्टी विस्तारात उत्तरेकडून सुरत-मुंवई कडून ब्रिटीश तर गोवा, इ. भागातून पोर्तुगीज तर मध्य किनारपट्टीलगत सिद्धी हे शत्रू होते. स्वराज्याचा पाया तोरणा घेऊन १६४६-४७ मध्ये तर किनारपट्टीचा पहिला विजय शिवाजी राज्यांनी १६५६ मध्ये दाभोळ घेऊन घेतला.

भारतात पोर्तुगीज इ.स. १४९८ ला कालिकतला सर्वप्रथम पोहचले. त्याच्या अगोदर १४८५ ला हवशींनी जंजिरा घेतला.६ १४८५ पासून जंजिऱ्यावर हब्शी निर्विवादपणे राज्य करीत होते. ऑक्टोवर १६५७ मध्ये शिवाजी राज्यांनी कल्याण भिवंडीचा प्रदेश जिंकला. इ.स. १६६१ ला कोकण मोहीम काढली, १६६४ ला सिंधुदुर्ग हाती घेतला, तीन लढाऊ मोठ्या नौका, ८५ गलवते, ६००० सैनिक व तरवेज निष्ठावंत सहकार्यासह शिवाजी राज्यांनी वसनूर मोहीम काढली.(इ.स. १६६५). दाभोळ हे विजापुरच्या तर वसरूर हे केळदी राज्यातील समृध्द वंदर होते. सुरत वंदर हे मुघल वादशहाचे सर्वाधिक उत्पन्न-व्यापाराचे वंदर होते.

वसरूर ची मोहीम शिवाजी राजांनी हाती घेतली. तो दिवस ०८ फेब्रुवारी १६६५ हा होता. या दिवशी पोर्तुगीज व ब्रिटीश यांच्यात मुंवई हे हस्तांतर होणार होते. त्यामुळे ते व्यग्र असल्याने ही तारीख निच्छित केली. वसरूर मोहीम सफल करून शिवाजी राजांनी वसरूर राज्य सुरक्षित राखले, ताव्यात न घेता आणि पाश्चिमात्यांच्या ताव्यात न जाऊ देता स्वतंत्र राखले. दक्षिण किनारी भागात एक स्वतंत्र मित्र वनविला. केळदीच्या ताव्यातील वसरूर पोर्तुगीजांच्या ताव्यात जाऊ दिले नाही. यासाठी लागलेला खर्च वसरूर कडून खंडणी स्वरुपात घेतला. स्वराज्याचा पैसा वसरूरच्या मोहिमेसाठी खर्च केला नाही. मिरे आणि भातासाठी प्रसिध्द असणारे वसरूर वंदर मसाला व्यापारी पोर्तुगीजांच्या ताव्यात राज्यांनी जाऊ दिले नाही.

किल्ले हे स्वराज्याचे वलस्थाने होती. राज्यांनी जुने किल्ले घेतले तसे नवे किल्लेही वांधले किल्ल्यांच्या सहाय्याने स्वराज्यही वाढविले. गनिमी काव्याचा एक नवा साक्षात्कार घडविला. टोपीकर, फिरंगी, वलंदेज हे वरकड व्यापाऱ्यांसारखे सामान्य व्यापारी नाहीत ही ओळखण्याची दूरदृष्टी त्यांची होती समुद्रावरून येणाऱ्या आक्रमकांचा वंदोवस्त समुद्रावरच कला पाहिजे हे ओळखून डच, पोर्तुगीज, इंग्रज, हवशी आरमार चा पराभव करण्याएवढे जवरदस्त लढाऊ नौदल त्यांनी उभारले. प्राचीन काळात चौल राज्यानंतर लढाऊ आरमार ची कल्पना करणारा आणि प्रत्यक्ष आणणारा तो एकमेव राजा शिवाजी होता.

**पर्जन्यमान : माती-शेती-भातीचा घटक :**

सह्याद्रीच्या पश्चिमेचा भाग कोकण तर सह्याद्रीचा पठाराचा भाग स्वराज्याचा भूभाग होता.स्वराज्याचा विचार या भागात- कोकण प्रदेशात पडणारा पाऊस प्रचंड मोठ्या प्रमाणात पडतो तर अन्य भागात तो कमी पडतो. कोकणात पडणारा पाऊस मृग नक्षत्राच्या ४-५ दिवस अगोदर पडण्यास सुरुवात होते. साधारणपणे १ जून ला पाऊस कोकणात हजेरी देतो. या कोकण भागातील हवामान समशीतोष्ण व दमट, देशावरचे हवामान विषम आणि कोरडे, दुर्ग भागातील / वरील हवामान थंड, आल्हाददायक आणि आरोग्यवर्धक असे आहे. हवामानावरोवरच महाराष्ट्राचे जीवन म्हणजेच शेती ही या भागात पडणाऱ्या मोसमी-मान्सून-नैऋत्य मोसमी वाऱ्यावर आधारित आहे. महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण सह्याद्री, सातपुडा, अजिंठा, वालाघाट, महादेव या डोंगरांच्या रांगांवर अवलंवून आहे. त्यामुळे येथील मातीवर शेती आणि भाती व्यवहार अवलंवून आहेत.

कमी अधिक दावाच्या क्षेत्रावर हा पाऊस कमी अधिक प्रमाणात पडतो. याच कारणाने कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ अशी परिस्थिती असते. मृग, आर्द्रा, पुनवर्सू, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा आणि हस्त या पंधरा-पंधरा दिवसांच्या नक्षत्राचा काळ. एकूण १३५-१४० दिवस हे पर्जन्य नक्षत्रांचे. चित्रा नक्षत्रात दसरा येतो. दसऱ्याला वाहेर पडलेला मावळ शेती आणि भातीची सर्व कामे आटपून स्वराज्याच्या कार्यासाठी जात असे. मात्र मृग नक्षत्र ते दसरा या कालावधीत तो (पर्जन्यकाळ) तो स्वघरी (स्व-राज्य)



Scanned by CamScanner

असे आणि सिमोलंघनानंतर मात्र तो स्वराज्यासाठी असे. दसरा ते अक्षय तृतीय या कालावधीत मावळा आणि शिवाजी राजे स्वराज्यासाठी तर अक्षय तृतीया ते दसरा या कालावधीत शेती-माती-भातीच्या कामासाठी मावळा आणि शिवाजी राजे कार्यरत असत. पाणी हा घटक स्वराज्यात सर्वाधिक महत्वाचा होता. स्वराज्य गड किल्ल्यांच्या द्वारा नियंत्रित होते. वनदुर्ग, जलदुर्ग, दुर्ग, भुईकोट यांचा विचार करता स्वराज्यात एकूण ४०० पेक्षा अधिक किल्ले होते. यातील शिवाजी राज्यांनी १११ किल्ले नवीन वांधले होते. किल्ले अथवा वसती आणि शेतीसाठी जलसंवर्धन राज्यांनी वसती, प्राणी आणि शेती यासाठी विशेष करून सुरक्षित आणि विपुल प्रमाणात केले होते. किल्ल्यावरील पाण्याचा प्रमुख व एकमेव स्रोत हा पर्जन्य हाच होता. तर वसतीसाठी आणि शेतीसाठी पाण्याचा स्रोत पर्जन्य आणि अन्य (नदी-नाले-विहिरी-तलाव-कालवे) हा होता. किल्ल्यांची व्यवस्था आणि रक्षण हे पाणी, अन्न आणि सुरक्षा या तीन घटकांवर आधारित होती.

**वनसंपदा:**

स्वराज्याला लागत असणारा सह्याद्रीचा निसर्ग जैव विविधतेने नटलेला प्रदेश, डोंगर माथ्यावरची, डोंगर उतारावरची, पठारावरची, सागर किनाऱ्यावरील- तटीय प्रदेशातील आणि दुआवाच्या प्रदेशातील वनसंपदात वैविध्यता आहे. वहामानीच्या काळात-महानुभवांच्या काळात महाराष्ट्राच्या या वैविध्यपूर्ण वनसंपदेचे वर्णन करतांना फेरिश्ता लिहितो कि, "सूर्याच्या प्रखर किरणांना देखील भेदून आत येण्याची हिम्मत होत नाही" वन संपदेचा वापर आणि घनदाटपना लक्षात घेऊनच शिवाजी राज्यांनी प्रताप गडाचे युद्ध जिंकले. दऱ्या-खोऱ्या आणि वनसंपदा यांचा वापर युध्दात केला. किल्ल्यांचे विजय आणि रक्षण करताना या वनसंपदेचे महत्व अधिक कौशल्यपणे शिवाजी राज्यांनी वापरले. या वनसंपदेचा आणि कोकणात हत्तीच्या सोंडेप्रमाणे पडणाऱ्या पर्जन्याच्या काळ या कालखंडात लढविण्याची तयारी करण्यात आली होती.

शिवाजी राजांचा राज्याभिषेक हा ०६ जुन १६७४ ला रायगडावर झाला हा काळ मृग नक्षत्राचा. मृग नक्षत्रात पडणारा कोकणातील पाऊस आणि शेतीची कामे यांचा विचार करता पेरणीची कामे कोकणात उरकलेली असतात अथवा उरकण्याच्या मार्गावर असतात. पाण्याची टंचाई होत नाही असा काळ रायगड राज्याभिषेकासाठी तयार होता. पाणी आणि अन्न घटक हा विपुल असेल तर किल्याचे रक्षण अवघड कार्य नाही. राज्याभिषेकासाठी शिवाजी राजांनी पर्जन्य काळ निवडला. राज्याभिषेकासाठी आलेला मावळा-कृपक यांची गैर सोय होणार नाही याची काळजी घेतली.

जगातील पहिलीच सुवर्ण संकल्पना 'पाणी आडवा-पाणी जिरवा' 'झाडे- लावा झाडे जगवा' म्हणजेच आजचे सामाजिक वनीकरण ही संकल्पना सत्यात शिवाजी राजांनी उतरविली. शिवाजी राजांनी स्वराज्यातील जमिनीची मोजदाद केली. पाच हात पाच वोटे या मापाची काठी वनविली. २० काठी वरोवर एक विघा, १२० विघा वरोवर एक चावर. शेतीची मोजदाद करणारा आणि त्यानुसार जमीन सातवारा पध्दती सुरु करणारे आणि त्यानुसार सारा गोळा करण्याची पध्दती शिवाजी राजांनी विकसित केली.

स्वराज्याच्या प्रभागात प्रामुख्याने कोकणाला सर्वाधिक महत्व होते. आज्ञापत्रात रामचंद्र अमात्य नमूद करतात की, आरमारच्या उभारणी करिता लाकडाची आवश्यकता आणि उपयुक्तता महत्वपूर्ण आहे. त्यासाठी फणस-आंवा यांचे लाकूड उपयुक्त आहे. पण ते तोडू नये, फक्त जीर्ण झाडे तोडावीत.

सारांश उपरोक्त भौगोलिक घटकांचा उपयोग शिवाजी राजांनी स्वराज्याच्या जडण-घडणीसाठी केला.

**संदर्भ:**


१. पाण्डेय, श्री. नेत्र ;प्राचीन भारत का इतिहास, लोकभारती प्रकाशन, इलाहावाद, १९९४, जिल्द-एक,पृ.२४.
२. कित्ता .; पृ. २४-२५.
३. पाठक, डॉ. अरुणचंद्र ; मध्ययुगीन कालखंड (राजकीय सामाजिक इतिहास), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंवई, मराठी आवृत्ती २०१४, पृ.फलक क्र.५.
४. कित्ता. ; पृ. ०२.
५. कित्ता. ; फलक क्र.०५.
६. शिवराजमुद्रा ; छत्रपती श्री शिवाजी महाराज मिशन सांवत्सरिक राज्यरोहण समारोह,०२ जुने १९७४, द्वितीय आवृत्ती, फेब्रु. १९७५, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, मुंवई,पृ.३६-३७.
७. कित्ता.
८. कित्ता.
९. जोशी, मुकुंद. ना. ; महाराजांच्या लढाया, मनोदय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च २०००, पृ.३७-५३.
१०. कित्ता. ;
११. आपला महाराष्ट्र ;परंपरा व प्रगती, महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवी प्रकाशन, १९८५, मुंवई, पृ.४५.
१२. पाठक, डॉ. अरुणचंद्र ; मध्ययुगीन कालखंड, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंवई, मराठी आवृत्ती, २०१४, पृ. ०४.


❑❑❑



Scanned by CamScanner